

# पुणे विद्यापीठ

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ
विद्यार्थी कल्याण मंडळ

डॉ. पंडीत एन. शेळके
(एम.एस्सी., पीएच्.डी.)
संचालक : विद्यार्थी कल्याण मंडळ

संदर्भ क्र. विकमं/२०१२/४४५

दिनांक : १७ सप्टेंबर, २०१२.

प्रति,
**मा. प्राचार्य /संचालक,**
पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालये/
मान्यताप्राप्त संस्था

**विषय: शोध निबंध स्पर्धेसाठी निबंध पाठविणेबाबत..........**

महोदय/महोदया,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि शांतिनिकेतन लोकविद्यापीठ, सांगली आयोजित महाराष्ट्र राज्य सुवर्णमहोत्सव सिंहावलोकन परिषदेच्यावतीने प्राध्यापक/संशोधक विद्यार्थ्यांसाठी ''महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सव, यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्ष व भारतीय संविधान हिरकमहोत्सवी वर्ष आणि पंचायत राज व्यवस्थेचा सुवर्ण महोत्सव'' या निमित्ताने गेल्या ५०—६० वर्षात आपल्या राज्याने जी वाटचाल केली आहे. त्या वाटचालीचे सर्वकष मूल्यमापन व्हावे आणि भविष्यकालीन प्रगतीच्या दिशा स्पष्ट होण्यासाठी शोध निबंध स्पर्धेचे आयोजन केलेले आहे.

तरी आपणांस विनंती की, या स्पर्धेकरीता जास्तीत जास्त शोध निबंध पाठवावेत.
कळावे,

17/9/12

**(डॉ. पंडित एन. शेळके)**
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

**सोबत : वरीलप्रमाणे.**

**विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.**
**दूरध्वनी** : ०२०-२५६०११५४, ६५००३७०० **फॅक्स** : ०२०-२५६०११५४ **भ्रमणध्वनी** : ९८५०१७६५७५
ई-मेल : pnshelke@gmail.com, bsw@unipune.ac.in

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि शांतिनिकेतन लोकविद्यापीठ, सांगली आयोजित

# महाराष्ट्र राज्य सुवर्णमहोत्सव सिंहावलोकन परिषद

जा. क्र./महासुवर्ण सिंहावलोकन/ ०३ /२०१२-१३ दिनांक :२०/८/२०१२


✲ निमंत्रक ✲

कै. श्री. भाऊसाहेब थोरात
कै. श्री. मधुकरराव चौधरी
कै. हिंदकेसरी मारुती माने पाटील
कै. स्वा. से. व्यंकटराव रणधीर
कै. श्रीमती डॉ. चित्राताई नाईक
कै. प्रभाकर कुंटे
कै. बापूसा काळदाते
न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी
खा. बाळासाहेब विखे-पाटील
श्री. मोहन धारिया
श्री. राम प्रधान
श्री. प्रतापराव भोसले
श्री. माधवराव गोडबोले
श्री. भुजंगराव कुलकर्णी
प्रा. डॉ. एन. डी. पाटील
श्री. रमेश पानसे
श्री. शांताराम पोटदुखे
श्री. जनार्दन वाघमारे
ॲड. भगवानराव देशपांडे
आ. विलासराव उंडाळकर
श्री. राम नाकवले
श्री. हुसेन दलवाई
डॉ. भालचंद्र मुणगेकर
श्री. रावसो कसबे
स्वा. सै. धोंडीराम (बापू) माळी
श्री. गिरीष गांधी
श्री. मधुकरराव मुळे
डॉ. जयंतराव पाटील (बोर्डी)
डॉ. नरेंद्र चपळगावकर
कुलगुरु आर. कृष्णकुमार
श्री. विजय बोराडे
डॉ. जयसिंगराव पवार
प्रा. श्रीराम जाधव
डॉ. सुधीर गव्हाणे , माजी कुलगुरु
कुलगुरु डॉ. एन. जे. पवार
आम. सा. रे. पाटील
मा. कल्लाप्पाआण्णा आवाडे
डॉ. रमेश वरखेडे
डॉ. भालबा विभूते
खा. गोविंदराव आदिक


प्रति,

मा. कुलसचिव,

Inward No. 2021
Date 10-9-2012
BCUD
University of Pune

कुलगुरु कार्यालय
पुणे विद्यापीठ
आवक क्र. व्हीसी/ 4907
आवक दिनांक: 7/9/2012
जावक दिनांक: 10/9/2012

विषय :– प्राध्यापक / संशोधक विद्यार्थ्यासाठी शोध निबंध स्पर्धा आयोजनाबाबत....

महोदय,

वरील विषयास अनुसरुन महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सव सिंहावलोकन परिषदेच्या सर्व निमंत्रकांच्यावतीने आपणांस आवाहन करतो की, ''महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सव, यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्ष व भारतीय संविधान हिरकमहोत्सवी वर्ष आणि पंचायत राज व्यवस्थेचा सुवर्ण महोत्सव'' या निमित्ताने गेल्या ५०-६० वर्षात आपल्या राज्याने जी वाटचाल केली आहे. त्या वाटचालीचे सर्वकष मूल्यमापन व्हावे आणि भविष्यकालीन प्रगतीच्या दिशा स्पष्ट होण्यासाठी या शोध निबंध स्पर्धाचे आयोजन केलेले आहे.

आपणांस विनंती की, विद्यापीठीय पातळीवर काम करीत असलेले प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी तसेच आपल्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयामधील प्राध्यापक आणि संशोधनामध्ये रस असलेल्या व्यक्ती यांनी या शोधनिबंध स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे याकरिता आपल्यावतीने सर्वांना कळवून आपल्या राज्याच्या विकासाच्या दृष्टीने आम्ही परिषदेमार्फत हाती घेतलेल्या या विधायक उपक्रमास सहकार्य करावे अशी विनंती आहे.

कळावे,

BCUD
8/9/12

आपला विश्वासू,

(प्रा.डॉ.पी.बी.पाटील)

Dr. Pandit Shelke
SWO
Pl. communicate to concerned.
10-9-2012

सोबत :–
शोधनिबंध स्पर्धा आयोजन आराखडा

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी –
मा.संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

Mr. Gund
Pl. do the needful.
12/9/12

विद्यार्थी कल्याण मंडळ
आवक/जावक क्र.:- 1670

# महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सव सिंहावलोकन परिषद

## प्राध्यापक / संशोधक विद्यार्थी यांना

## शोध निबंध पाठविण्यासाठी आवाहन

**'महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सव यशवंतराव चव्हाण जन्म शताब्दी वर्ष, भारतीय संविधान हिरक महोत्सवी वर्ष आणि पंचायतराज व्यवस्थेचे सुवर्ण महोत्सव या निमित्ताने या संदर्भात गेल्या ५० ते ६० वर्षांमध्ये जी वाटचाल झालेली आहे त्या वाटचालीस साक्षेपि मूल्यमापन व्हावे आणि भविष्यकालीन प्रगतीची दिशा स्पष्ट व्हाव्यात यासाठी शोध निबंध पाठविण्याबद्दल आवाहन करण्यात येत आहे. '**

### * शोध निबंधांचे महत्त्व -

शोध निबंधाचे महत्वाचे संदर्भ साहित्य म्हणून आहेच. परंतु, त्याचबरोबर भविष्यकालिन दिशा दिग्दर्शन प्राप्त होण्याचा तो एक महत्त्वाचा मार्ग आहे. कारण, शोध निबंध विशिष्ट शास्त्रीय अभ्यास पद्धतीचा वापर करुन, संदर्भीय विषयास अनुसरुन महत्वांच्या आयामांचा शोध घेवून त्याची मांडणी केली जाते व त्या मांडणीच्या आधारावर साक्षेपीवृत्तीने दिशा दिग्दर्शन केले जाते. शोध निबंधात व्यक्तीनिष्ठतेपेक्षा वस्तुनिष्ठता महत्वाची असते. संदर्भीय विषयाकडे त्रयस्त पद्धतीने पाहून त्या विषयाचे वैचारिक मूल्य मांडणी म्हणून पुढे आणली जाते. हे काम तज्ज्ञ संशोधन चांगल्या पद्धतीने करीत असतात. या गोष्टी लक्षात घेता शोध निबंध स्पर्धांचे आयोजन करावे आणि त्यामधून प्राप्त होणाऱ्या उत्कृष्ट शोध निबंधांचे संकलन करुन ते पुस्तक रुपाने प्रकाशित करावे असा विचार आम्ही केलेला आहे.

### * शोध निबंध स्पर्धेचे विषय -

१) यशवंतराव चव्हाणांचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान
२) महाराष्ट्र राज्यातील पंचायतराज व्यवस्था — एक मूल्यमापन
३) भारतीय संविधानाची ६० वर्षे — मूल्यमापन
४) शाश्वत विकासाची मूलतत्वे
५) महाराष्ट्र २०३०

### * शोध निबंध कोण पाठवू शकतो -

विद्यापीठीय पातळीवर काम करीत असलेले प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी, महाविद्यालयांमधील प्राध्यापक आणि संशोधनामध्ये रस असलेल्या व्यक्ती यांच्यासाठी या शोध निबंध स्पर्धाचे आयोजन केलेले आहे.

* **उत्कृष्ट शोध निबंध -**

वर दिलेल्या प्रत्येक विषयातील तीन उत्कृष्ट शोध निबंधांची निवड तज्ज्ञ परीक्षकांकडून केली जाईल. म्हणजेच, एकूण १५ निबंधांची निवड होईल. प्रत्येक विषयावरील प्रथम ३ क्रमांकास प्रोत्साहनपर पारितोषिके देण्यात येईल.

| | |
|---|---|
| * **प्रथम क्रमांक** | - रु ५०००/- |
| **द्वितीय क्रमांक** | - रु ४०००/- |
| **तृतीय क्रमांक** | - रु ३०००/- |
| **चतुर्थ आणि पाचवा क्रमांक** | - **उत्तेजनार्थ प्रमाणपत्रे** |

* **शोध निबंध पाठविणेबाबत -**

उपरोक्त कोणत्याही विषयावरील शोध निबंध लिहीत असताना त्याची मांडणी संशोधन पद्धतीने झालेली असली पाहिजे. शोधनिबंधाची मांडणी प्रास्ताविक, उद्देश, गृहितके, व्याप्ती, संशोधन पद्धती यांच्या आधारावर व्हावी. त्याचबरोबर शोध निबंध लिहिताना ज्या साहित्यांचा संदर्भ घेतलेला असेल त्याची नोंद शास्त्रीय पद्धतीने निबंधाच्या शेवटी संदर्भ सूची खाली देण्यात यावी. हे शोध निबंध टंकलिखित असावेत. ते **ए-४ साईजच्या कागदावर, १६ फॉंटमध्ये *Kruti Dev, Shree Lipi Dev Ratna* ७०८, ७०९** *या फॉंट टाईपमधून दीड स्पेस मध्ये* टंकलिखित केलेले असावेत. त्याची एक हार्ड कॉपी {मुद्रित प्रत} आणि एक सॉफ्ट कॉपी {सी.डी.} ही पाठवून द्यावी.

* **शोध निबंधांचे माध्यम** - मराठी

* अंतिम मुदत -

हे शोध निबंध **१५ ऑक्टोबर, २०१२** पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावेत.

प्रा.{डॉ.} भालबा विभूते,
*संचालक व विभागप्रमुख,*
प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४

संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक - ०२३१- २६०९१५०, २६०५७०३
मोबाईल क्रमांक - ९४२२५८०७५४
E-mail - bhalba@indiatimes.com

कळावे,

प्रा.डॉ.पी.बी.पाटील